**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. – ३</u>** **<u>नि.दि.दा.क्र.७३/२०२३</u>**
**यादवराव विरुध्द मनोहर**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – २८**

**<u>सरतपासणी शपथेवर सुरु वादी तर्फे वकील श्री. गजवे यांच्या मार्फत</u>**

४. मी सदर प्रकरणात माझे सरतपासाचे लेख दाखल केला असून त्यातील मजकूर माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. तो निशाणी २८ वर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री पुडके यांच्यातर्फे**

५. वादी माझा भाऊ आहे. वादीच्या व प्रतिवादी क्र.१ च्या घरामध्ये आम्हाला जाण्यायेण्यासाठी ६ फुटाची गल्ली असल्याबाबतचा दस्त मी प्रकरणात दाखल केला आहे. तसा कागद अभिलेखावर दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की वादी व प्रतिवादी क्र.१ च्या घराच्या दरम्यान अशी कोणतीही ६ फुटाची गल्ली नसल्याने तसा कागद मी दाखल केला नाही. मी किंवा वादीने वादीच्या व प्रतिवादीच्या घराच्या जागेची शासकिय मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या व प्रतिवादी क्र.१ च्या घरासमोर शासकिय रस्ता आहे. तो रस्ता ७ फुट रूंदीचा असून तो मुख्य रस्त्याला जाऊन मिळतो. हे म्हणणे खरे आहे की वादी व प्रतिवादी क्र.१ मुख्य रस्त्याला जाण्यासाठी त्यांच्या घरासमोरील रस्त्याचा वापर करतात.

६. हे म्हणणे खरे नाही की वादी व प्रतिवादी क्र.१ च्या घराच्या दरम्यान जाण्या येण्यासाठी ६ फुटाची गल्ली असल्याबाबतचा मजकुर मी पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात चुकीचा लिहलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ ने त्या गल्लीत बांधकाम करून आमच्या जाण्या येण्याचा रस्ता बंद हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या गल्लीशिवाय आम्हाला जाण्यायेण्यासाठी दुसरा मार्ग नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की गल्ली बंद केल्यावर आम्हाला जाण्यायेण्यासाठी अडचण होते.

७. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी क्र.१ सोबत माझे व वादी चे पटत नाही. हे म्हणणे

खरे नाही की प्रतिवादी क्र.१ ला त्रास देण्यासाठी मी व माझ्या भावाने खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की भावाच्या सांगण्यावरून खोटे शपथपत्र दाखल केले.

**उलटतपास संपला.**
**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/-**

कामठी
दिनांक १९/११/२०२४

( मोहन रा. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी